**कोव्हीड -१९ संदर्भात शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाशी संलग्नित रूग्णालये, सार्वजनिक आरोग्य विभाग व नगरविकास विभाग यांच्या अधिपत्याखालील रूग्णालये तसेच खाजगी रूग्णालयात स्वतंत्र विलगीकरण इमारत/ कक्ष निर्माण करण्याबाबत मार्गदर्शक सूचना .**

**महाराष्ट्र शासन**

वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग

शासन परिपत्रक क्रमांकः वैशिवि-२०२०/प्र.क्र.११०/२०/प्रशा-२,

गोकुळदास तेजपाल रुग्णालय आवार, ९ वा मजला, लोकमान्य टिळक मार्ग,

मुंबई-१,दिनांक १ एप्रिल २०२०.

**परिपत्रक**

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दिनांक १४.३.२०२० च्या अधिसूचनेन्वये राज्यात साथरोग अधिनियम १८९७ ची अंमलबजावणी करण्यात येत असून सदर अधिनियमाच्या खंड - २ (१) नूसार संचालक ,आरोग्य सेवा तसेच संचालक ,वैद्यकीय शिक्षण व संशोधन मुंबई यांना त्यांच्या कार्यक्षेत्रात कोव्हीड १९ वर नियंत्रण आणण्यासाठी व प्रादुर्भाव रोखण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत सक्षम प्राधिकारी म्हणून घोषीत करण्यात आले आहे.

सर्वसाधारण रूग्ण व कोरोना बाधित रूग्ण यांची सरमिसळ न होता तसेच संभाव्य संसर्ग टाळण्यासाठी National Centre for Disease Control ,New Delhi यांनी मार्गदर्शक सूचना प्रसारित केल्या आहेत. यामध्ये शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाशी संलग्नित रूग्णालये,सार्वजनिक आरोग्य विभाग व नगरविकास विभाग यांच्या अधिपत्याखालील रूग्णालये तसेच खाजगी रूग्णालयात स्वतंत्र विलगीकरण इमारत /कक्ष निर्माण करण्याबाबतच्या खालील मार्गदर्शक सूचनांचा समावेश आहे.

१. उपरोक्त सर्व रूग्णालयांमध्ये स्वतंत्र विलगीकरण इमारत निर्माण करणे आवश्यक आहे.

१.१ वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या अधिनस्त संस्थासाठी स्वतंत्र विलगीकरण इमारतीमध्ये किमान ६० रूग्ण खाटा तर सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अधिनस्त संस्था

Scanned by CamScanner

व इतर उर्वरित संस्थामध्ये किमान ५० रूग्ण खाटा आवश्यक त्या साधन सामुग्रीसह उपलब्ध करणे अनिवार्य आहे.

१.२ उक्त विलगीकरण इमारत दैनंदिन रूग्णसेवेला बाधा ठरणारी नसावी.

१.३ सदर विलगीकरण कक्षाकरिता स्वतंत्र प्रशिक्षीत मनुष्यबळ नामनिर्देशित(Ear Marked) करण्यात यावा.

२. सदर विलगीकरण कक्षाकरिता National Centre for Disease Control ,New Delhi यांचेव्दारा तयार करण्यात आलेले COVID -१९ Outbreak, Guidelines for Setting up Isolation Facility/ Ward या मार्गदर्शक सूचनांचा व मानकांचे काटेकोरपणे पालन होणे अनिवार्य आहे.

*(weblink-https://ncdc.gov.in//WriteReadData/1892s/42417646181584529159.pdf)*

३.ज्या सरकारी व खाजगी रूग्णालयांना स्वतंत्र विलगीकरण कक्षाची इमारत उपलब्ध करणे शक्य नाही, अशा रूग्णालयांनी त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या सोयीसुविधांचा उपयोग करून स्वतंत्र विलगीकरण कक्ष निर्माण करणे गरजेचे आहे. सदर कक्ष /इमारत तयार करताना खालील एस.ओ.पी .चे अनुकरण करावे.

३.१ सदरचे विलगीकरण कक्ष निर्माण करताना उक्त रूग्णांलयांकरिता किमान दोन प्रवेश व्दार (Separate Entry and Exit) असणे आवश्यक आहे.ताप,खोकला,श्वसनाचा त्रास असणाऱ्या रूग्णाना रूग्णालयीन प्रवेशव्दारावरच वर्गीकरण करून कोव्हीड -१९ कक्षाकरिता संदर्भीत करावेत.कोव्हीड १९ संशयित रूग्ण व त्याकरिता नामनिर्देशित केलेले मनुष्यबळ, इतर रूग्ण व रूग्णालयातील इतर कर्मचारी यांचे संपर्कात येणार नाही,याची कृपया दक्षता घ्यावी.

३.२ विलगीकरण कक्ष निर्माण करताना त्यामध्ये उपलब्ध रूग्ण खाटांच्या तुलनेत ६० टक्के खाटा Suspected रूग्णाकरता आरक्षीत करणे आवश्यक आहे. ३० टक्के रूग्ण खाटा जे रूग्ण कोरोना बाधीत आहेत त्यांच्याकरिता आरक्षीत करणे आवश्यक आहे. तसेच किमान १० टक्के खाटा अतिदक्षता (आयसीसीयू) करिता राखीव ठेवणे अनिवार्य आहे.

३.३ सदर खाजगी अथवा सरकारी रूग्णालयामध्ये मध्यवर्ती वातानुकुलीत यंत्रणा (Centralized AC) कार्यान्वित असल्यास उक्त यंत्रणा कोव्हीड -१९ आजाराकरिता आरक्षीत करण्यात आलेल्या विलगीकरण कक्षामध्ये बंद ठेवणे बंधनकारक आहे.

३.४ सदर विलगीकरण कक्षाकरिता स्वतंत्र प्रशिक्षीत मनुष्यबळ नामनिर्देशित (Ear Marked)करण्यात यावा.

Scanned by CamScanner

३.५ वरील स्वतंत्र विलगीकरण कक्ष निर्माण करताना केद्र शासनाने निर्धारित केलेल्या मार्गदर्शक सूचनांचे संबंधित खाजगी व सरकारी रूग्णालयांनी त्यांचे तंतोतंत पालन करणे क्रमप्राप्त आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(डॉ.संजय मुखर्जी )
सचिव,महाराष्ट्र शासन

प्रति,

१.प्रधान सचिव ,मा.मुख्यमंत्री सचिवालय,मंत्रालय,मुंबई.

२.मा.उपमुख्यमंत्री,मंत्रालय,मुंबई यांचे खाजगी सचिव

३.मा.मंत्री,सार्वजनिक आरोग्य विभाग,मंत्रालय ,मुंबई यांचे खाजगी सचिव.

४.मा.मंत्री ,वैद्यकीय शिक्षण विभाग ,मंत्रालय ,मुंबई यांचे खाजगी सचिव.

५.मा.राज्यमंत्री,सार्वजनिक आरोग्य विभाग/ वैद्यकीय शिक्षण विभाग,मंत्रालय,मुंबई यांचे खाजगी सचिव.

६.उपसचिव,मा.मुख्यसचिव कार्यालय,मंत्रालय, मुंबई .

७.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग,मंत्रालय ,मुंबई.

८.प्रधान सचिव,मंत्रालय कोरोना नियंत्रण कक्ष,मंत्रालय मुंबई.

९.प्रधान सचिव,नगरविकास विभाग,मंत्रालय,मुंबई.

१०.संचालक, वैद्यकिय शिक्षण व संशोधन, मुंबई / संचालक, आरोग्य सेवा ,मुंबई/आयुक्त,सर्व महानगरपालिका यांना विनंती करण्यात येते की सदर परिपत्रक आपल्या अधिपत्याखालील संस्थांच्या तसेच खाजगी रूग्णालयांच्या निदर्शनास आणून यातील मार्गदर्शक सूचनांची काटेकोर अमंलबजावणी करण्याबाबत आपल्या स्तरावरून योग्य तो पाठपुरावा करण्यात यावा.

११.सर्व विभागीय आयुक्त/सर्व जिल्हाधिकारी/ मुख्य कार्यकारी अधिकारी सर्व जिल्हापरिषदा यांना आवश्यक कार्यवाहीस्तव.

Scanned by CamScanner